# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### बोरीवडे (ता. पन्हाळा,जि. कोल्हापूर) येथील तीन बचत गटांनी मिनी ट्रॅक्टर योजनेमध्ये केलेला गैरव्यवहार

**(१) २०३०२ (१५-०१-२०२१) डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवडे (ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील निनाई मसाई पुरूष बचत गट, भैरवनाथ पुरूष बचत गट व राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुरूष बचत गट या तीन बचत गटांमध्ये अनियमितता असतानाही तत्कालीन अधिकारी यांनी संगनमत करून मिनी ट्रॅक्टर दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनियमितता असतानाही जप्त केलेले मिनी ट्रॅक्टर पुन्हा सद्यःस्थितीत कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याने अनियमितता कायम ठेवून तसेच संबंधितावर कोणतीही कारवाई न करता सदर बचत गटांना मिनी ट्रॅक्टर परत दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाबी संदर्भात बचत गटातील सदस्यांनी फसवणूक केली असल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने चौकशीत दोषी आढळून आलेल्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२३) : (**१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही

(४) होय, याबाबत सहाय्यक आयुक्त समाज कल्याण पुणे यांचे मार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशी अंती श्री. रितेश सोनवणे यांनी तक्रार वजा दिलेल्या पत्रामधील केलेल्या आरोपामध्ये तथ्य दिसून येत नसल्याचे चौकशी समितीची धारणा असल्याचे अभिप्राय समितीने दिले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चूरणी (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील एका तीन वर्षीय बालकावर पोटावर अघोरी विद्येचा प्रयोग केल्याबाबत

**(२) ३०२३१ (०९-०६-२०२१). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चूरणी (ता.चिखलदरा जि.अमरावती) येथे एका तीन वर्षीय बालकाच्या पोटावर अघोरी उपचाराने गरम चटके दिल्याची घटना दिनांक २ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बालकाची प्रकृती बिघडल्याने त्याला पुढील उपचारासाठी अमरावती येथे नेण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील वर्षभरातील ही पाचवी घटना असून या अघोरी उपचारांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२३) :**१) व २) होय.

(३) यापूर्वी सन २०२० मध्ये पोलीस स्टेशन चिखलदरा येथे एक घटना घडली होती. त्यामध्ये आरोपीने ८ वर्षाच्या मुलाला अंधश्रध्देतून चटके दिले होते. सदर प्रकरणात गुन्हा नोंद करण्यात येवून आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.

तसेच पिंपरी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड येथे सन २०२० मध्ये अंधश्रध्देतून लौंगिक अत्याचार केल्याची घटना घडली असून त्यामध्ये गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

सन २०२१ मध्ये नांदेड जिल्हयात गुप्तधन मिळविण्याच्या हेतून घडलेल्या घटनेत एकूण ८ आरोपींना अटक करण्यात आली असून, आरोपींविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) चुरणी येथील घटनेच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन चिखलदरा येथे अप क्र.१५०/२१ भा.दं.वि. कलम ३२४ सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ कलम ३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोरेगाव (मुंबई) येथील आरे परिसरात पुनर्वसन प्रकल्प राबविण्यात येत असल्याबाबत**

**(३) ३११११ (१८-०६-२०२१). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) येथील आरे परिसरात ३२३१० वर्ग फुट जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविण्यात येत असल्याची बाब माहे मे २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरे परिसरामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यास मा. उच्च न्यायालयाची मनाई आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाची मनाई असताना हा प्रकल्प घोषित करण्याची कारणे काय आहेत व सदर प्रकल्प तात्काळ रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

सध्या आरे परिसरात ३२३१० वर्ग फूट जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत कोणतीही योजना राबविण्यात येत नाही.

(२) हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या W.P.३०५/१९९५ & W.P.९२५/२००० च्या आदेशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील परिसरात कुठलीही बांधकाम परवानगी देण्यास मनाई आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दिपनगर (ता.भुसावळ, जि.जळगांव) येथील औष्णिक ऊर्जा प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीं गेल्या त्या प्रकल्पबाधित ग्रामस्थाना प्रकल्पात सुरक्षा रक्षकांची नोकरी देण्याबाबत**

**(४) ३३३०५ (१२-०१-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिपनगर (ता.भुसावळ, जि.जळगांव) येथील औष्णिक ऊर्जा प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीं गेल्या त्या प्रकल्पबाधित वेल्हाळ गावचे ५० ग्रामस्थ प्रकल्पात सुरक्षा रक्षकांची नोकरी गेली २ ते ३ वर्षे करत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाजनको महाराष्ट्र सुरक्षा रक्षक महामंडळातुन भरती केल्याने प्रकल्प बाधित ग्रामस्थांना नोकरीवरुन काढण्यात आले असल्याने कोविडच्या परिस्थितीमुळे गेली ६ महिने सुरक्षा रक्षक यांना आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याने त्यांच्या कंटुबियांवर उपासमारिची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जमिनी गेलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या नोकरीत सामावून घेण्याबाबत महाजनकोने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही. तथापि दिपनगर, ता. भुसावळ येथील औष्णिक विद्युत केंद्र येथे जुलै २०१८ ते डिसेंबर २०२० या कालावधीत सुरक्षा व्यवस्थापनासाठी खाजगी सुरक्षा एजन्सी कार्यरत होती. सदर खाजगी सुरक्षा एजन्सीमध्ये वेल्हाळ गावातील एकूण २९ प्रकल्पग्रस्त नसलेले ग्रामस्थ कंत्राटी पध्दतीने सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत होते.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भातील पाच लाख टन धानकोंडा सडून खराब झाल्याबाबत

**(५) ३३६२७ (१२-०१-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने वीज निर्मिती बंद केल्यामुळे विदर्भातील पाच लाख टन राईस मिल उत्पादकाचा धानकोंडा बायोमास प्रकल्पानी खरेदी बंद केल्यामुळे सडून खराब होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया व गडचिरोली या पाच जिल्ह्यात दरवर्षी ४० ते ४५ लाख टन धानाची लागवड केली जात असून त्या धानापासून ५ लाख टन धानकोंडा निघत असल्याने नुकसान भरून काढण्याकरीता पुन्हा बायोमास प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुन्हा वीज निर्मिती सुरु करुन राईस मिल उत्पादकाच्या धानकोंडयावर बायोमास सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०४-२०२३) :** (१) राज्य शासनाने वीज निर्मिती बंदी केली हे खरे नाही. तथापि, बायोमास प्रकल्पांनी धानकोंडा खरेदी बंद केल्यामुळे काही प्रमाणात धानकोंडा खराब होत आहे, हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) राज्य शासनाने अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण, २००८ व २०१५ जाहिर केले आहे. सदर धोरणातंर्गत कृषी अवशेषांवर आधारीत वीज निर्मिती (बायोमास) प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यात आले आहे. राज्यात एकूण २३ बायोमास प्रकल्प (२३६ मे.वॅ.) आस्थापित करण्यात आले आहेत. सदर प्रकल्पांपैकी एकूण १० प्रकल्प (९३ मेगावॅट क्षमता) नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदीया व गडचिरोली या पाच जिल्ह्यात आस्थापित आहेत. या जिल्ह्यातील प्रकल्पांपैकी एकूण ०३ प्रकल्प कार्यरत असून ०१ प्रकल्प रखरखाव अभावी, ०५ प्रकल्प पीपीए अभावी बंद आहेत व ०१ प्रकल्प कार्यान्वित झालेला नाही. महावितरण कंपनीने एकूण २३६ मेगावॅट क्षमतेच्या कृषीजन्य अवशेषांवर आधारीत वीज निर्मिती प्रकल्पांसोबत वीज खरेदी करार केलेले आहेत. सदरचे वीज खरेदी करार मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या तरतूदीनुसार दीर्घकालीन कालावधीकरीता प्रकल्प कार्यान्वित केल्यानंतरच्या १३ वर्षासाठी करण्यात आले आहेत. या १३ वर्षाच्या कालावधीत आजपर्यंत कोणतेही वीज खरेदी करार रद्दबादल करण्यात आलेले नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेतर्फे ( महाज्योती ) ओबीसी,व्हीजेएनटी आणि विशेष मागास वर्गातील युवकांना ''कर्मर्शियल पायलट '' चे निःशुल्क प्रशिक्षण देण्यासाठी करार केलेला नागपूर येथील फ्लाईंग क्लब बंद असल्याबाबत**

**(६) ३३८७१ (१२-०१-२०२२). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेतर्फे (महाज्योती) ओबीसी, व्हीजेएनटी आणि विशेष मागास वर्गातील युवकांना "कर्मर्शियल पायलट" चे निःशुल्क प्रशिक्षण देण्यासाठी नागपूर येथील फ्लाईंग क्लब बरोबर करार करुन अडीच कोटी रुपये देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त क्लब ४ वर्षापासून बंद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बंद असलेल्या फ्लाइंग क्लब बरोबर करार करुन अडीच कोटी रक्कम देण्याची कारणे काय आहेत,
( ४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१८-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) नागपूर फ्लाईंग क्लबकडे Director General Civil Aviation, New Delhi यांच्यामार्फत दि. १६/११/२०२१ ते दि. १५/११/२०२३ पर्यंत Flying Training Organization (FTO) ची मान्यता असुन उक्त क्लब सध्याला कार्यरत आहे. नागपूर फ्लाईंग क्लबकडे कमर्शिअल पायलट लायसेन्सचे प्रशिक्षणाची पूर्ण सुविधा उपलब्ध असून सद्यस्थितीत महाज्योती कडून प्रशिक्षणार्थ्यांची निवड करणेकरिता इच्छुक उमदेवाराकंडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दिव्यांग व्यक्ती कायद्या अंतर्गत नोंदणीकृत विशेष नागरिकांना कायमस्वरुपी अनुदान देण्याबाबत**

**(७) ३४६१४ (१२-०१-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांग व्यक्ती कायद्याअंतर्गत नोंदणीकृत काही विशेष नागरिकांना कायमस्वरुपी अनुदान देण्यासाठी सहा महिन्यात धोरण निश्चित करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शासनास दिला असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये, वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी काही विशेष नागरिकांना कायमस्वरुपी अनुदान मंजुर करताना राज्य सरकार मनमानी पद्धतीने वागत असल्याचे मा. उच्च न्यायालयाच्या सुनावणी दरम्यान आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य सरकारने ८ एप्रिल २०१५ रोजी च्या निर्णयाद्वारे १२३ विशेष नागरिकांना कायमस्वरुपी अनुदान दिले असुन त्यापैकी सन २०१९ मध्ये तीन विशेष नागरिकांना कायमस्वरुपी अनुदान मंजूर केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय चौकशीत काय निष्पन्न झाले
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कायआहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथील दाखल रिट याचिका क्र.३०५१/२०१९ खटेश्वर मागासवर्गीय बहु.व्यवसायिक शिक्षण संस्था, अमरावती विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दि.०६.०९.२०२१ रोजीच्या आदेशान्वये विशेष शाळांना कायमस्वरुपी अनुदान देण्यासाठी सहा महिन्यात धोरण निश्चित करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत.

(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
शासन निर्णय दि.०८.०४.२०१५ अन्वये १२३ विशेष शाळा/कर्मशाळांना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. सदरची मान्यता ही विशेष नागरिकांना नसून दिव्यांगांसाठीच्या विशेष शाळा/कर्मशाळांना दिली आहे.
(४) व (५) सदरहू प्रकरणी शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

---

## बुलढाणा जिल्हा पुरवठा विभागांतर्गत काळ्याबाजारात विक्रीसाठी जाणारा ३०० क्विंटल गहू बाळापुर पोलीसांनी पकडल्याबाबत

**(८) ३४८५८ (०७-०१-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हा पुरवठा विभागांतर्गत सार्वजनिक वितरण प्रणालीमधील काळ्याबाजारात विक्रीसाठी जाणारा ३०० क्विंटल गहू बाळापुर पोलीस यांनी अंतर्गत दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी व त्यासुमारास पकडला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खामगाव येथील ज्या गोडाऊनमध्ये सदर गहू ठेवला त्या ठिकाणी यापूर्वी देखील काळ्याबाजारात जाणारा सार्वजनिक वितरण प्रणालीचा गहू व इतर धान्यांची अफरातफर झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,
(४) असल्यास, संबंधितांवर याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२३) :** (१) होय.
(२) नाही
(३) व (४) होय, दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी काळ्याबाजारात जाणारा ३०० क्विंटल गहू पकडून बाळापूर पोलीस स्टेशन, जि. अकोला येथे अप क्र. ५२५/२१ अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ३, ७ अन्वये तसेच मोटार वाहन अधिनियम, १९५४ च्या कलम ३/१८१ अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली आहे. सदर गुन्हयाचा तपास पूर्ण झाला असून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे.

सन २०१८ मध्ये सार्वजनिक शासकीय वितरण प्रणालीचा ४.५ क्विंटल गहू काळ्याबाजारात विक्रीसाठी घेऊन जाताना मिळून आल्याप्रकरणी पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे अप क्र. १०७/२०१८ अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ३, ७ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. तसेच ४.५ क्विंटल तांदूळ खरेदी करून काळ्याबाजारात जादा दराने विक्रीसाठी घेऊन जाताना मिळून आल्याप्रकरणी पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे अप क्र. ३२१/२० अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ३, ७ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर दोन्ही गुन्हयांचा तपास पूर्ण झाला असून मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील दारुबंदी उठविल्यानंतर जिल्ह्यात गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(९) ३४९४२ (०५-०१-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी उठविण्याचा निर्णय दिनांक २७ मे, २०२१ रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील दारुबंदी उठविल्यानंतर जिल्ह्यात खून, बलात्कार, चोरीसह अनेक गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गुन्हेगारीच्या कारणांचा शोध घेण्यासाठी एक समिती गठित करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी समिती गठीत करुन गुन्हेगारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२३) :** (१) होय.
(२) चंद्रपूर जिल्हयात खुनामध्ये वाढ ही पुर्ववैमनस्य, अनैतिक संबध, जादुटोणा संशय अशा कारणामुळे झाली आहे. तसेच घरफोडी, चोरी या गुन्हेगारीच्या घटनामध्ये आकस्मिक मिळकत मिळवण्याच्या कारणामुळे वाढ झालेली आहे. तथापि दारूबंदी उठवल्यामुळे अशा घटना घडल्याचे निदर्शनास आले नाही.
(३) व (४) सदर प्रकरणी गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी समिती गठीत केलेली नाही. परंतु चंद्रपूर जिल्हयातील प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कायद्यान्वये गुन्हा नोंद करून तपास करून मा. न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात येत आहे. तसेच गुन्हे प्रतिबंध करण्यासाठी नाकाबंदी, नाईट राऊंड व ऑल ऑऊट ऑपरेशन सारख्या मोहिमा राबविण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### केंद्र शासनाने द्राक्ष निर्यातीसाठी सुरु केलेली भारत निर्यात व्यापारी योजनेस अनुदान देण्याबाबत

**(१०) ३५०४२ (०७-०१-२०२२). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने द्राक्ष निर्यातीसाठी भारत निर्यात व्यापारी योजना सुरु केली असुन या योजनेतंर्गत रु ४२००० प्रति कंटेनर अनुदान देण्यात येत असताना दिनांक १ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास सदरचे अनुदान बंद करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे निर्यातक्षम द्राक्ष अतिशय कमी भावाने विकली जात असुन अनुदान बंद झाल्याने त्याचा परिणाम निर्यातीवर देखील झाला असल्यामुळे सदरची योजना पुर्ववत सुरु करण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री व कृषी मंत्री यांचेकडे दिनांक २३ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सदरची योजना पूर्ववत सुरु करण्यासाठी राज्य शासन केंद्र शासनास शिफारस करणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०४-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
भारत निर्यात व्यापारी योजना ( Merchandise Export from India Scheme )सन २०२१-२२ पासून जागतिक व्यापार संघटनेच्या बंधनामुळे बंद करण्यात आली आहे.त्याऐवजी Schemes for Remission of Duties and Taxes on Exported Product (RoTEP) हि योजना केंद्र शासनाच्या उत्पादन शुल्क विभागामार्फत सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत ताजी द्राक्ष व प्रक्रियायुक्त द्राक्ष (मनुके) साठी अनुक्रमे ३% व २.५% अनुदान देण्यात येते.
(२) होय.
(३) भारत निर्यात व्यापारी योजनेऐवजी Schemes for Remission of Duties and Taxes on Exported Product (RoTEP) हि योजना केंद्र शासनामार्फत कार्यान्वित आहे.

अखिल भारतीय द्राक्ष उत्पादक निर्यातदार संघ यांच्या दि.१७. नोव्हेंबर २०२१ च्या निवेदनातील अडचणीच्या निराकरणाबाबत केंद्र शासनाच्या परकीय व्यापार महासंचालनालयास कृषी आयुक्तालयामार्फत दि.३.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई, (जि. बीड.) येथील स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प योजनेत झालेला गैरव्यवहार

**(११) ३५१२५ (१२-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई, (जि. बीड) येथे महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प (MACP), पुणे या योजने अंतर्गत सन-२०१६ मध्ये वा त्यादरम्यान ०१ कोटी ०८ लक्ष रुपयांचे काम मंजूर झाले असून सदर कामाचे टेंडर १७% कमीने सुटले असुन. सदर टेंडर मे. एस बी देशमुख दत्त मंदिर, देवपुर, धुळे. या एजन्सीला देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम निकृष्ट दर्ज्याचे होत असल्याबाबत सामाजिक कार्यकर्ते श्री, नंदकिशोर मुंदडा यांनी दि. १८ एप्रिल २०१७, ०९ मे, २०१७ व २५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली त्यानुसार कृषी उत्पन्न बाजार समितीचे अभियंता श्री, शेख इसरार व प्रकल्प अभियंता श्री, बगडी यांनी सदर कामाची प्रत्यक्ष पाहणी करून सदर काम अंदाजपत्रकाप्रमाणे होत नसून या सह इतर गंभीर आक्षेप घेत अहवाल दिला त्यानुसार सदर काम तांत्रिक मनकाप्रमाणे व आदर्श गुणवत्ता धोरणानुसार होत नसल्यामुळे महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प (MACP), पुणे. यांनी सदर काम रद्द केल्याचे व सदर कामाचे अनुदान देय होणार नाही असे कळवले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निकृष्ट व रद्द झालेल्या कामाचे धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार नसताना बाजार समितीच्या अशासकीय प्रशासकीय मंडळाने, विशेष लेखा परीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, बीड. व संबंधित कंत्राटदार याने संगनमत करून कंत्राटदाराच्या सोयीचा अहवाल देऊन सदर रद्द झालेल्या कामाचे तब्बल चार वर्षानंतर ३६,३९,०३९/- रुपयाचे देयक बाजार समितीच्या निधीतून अदा करून गैरव्यवहार झाला आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित दोषीवर गुन्हे दाखल करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सहकार व पणन मंत्री यांना दि. ११ ऑक्टोबर,२०२१, १३ ऑक्टोबर,२०२१, व १४ ऑक्टोबर,२०२१, रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली होती हे खरे आहे काय?
(५) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०४-२०२३) :** (१) महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत बाजार समितीच्या पायाभूत सुविधेच्या विकास करण्यासाठी बाजार समितीस ५० टक्के अनुदानावर विकास कामे करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाई, जि. बीड या बाजार समितीची निवड झालेली होती. त्यानुसार बाजार समितीने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य , पुणे यांची मान्यता घेऊन ई-निविदा प्रक्रिया राबवली होती व मे. एस. बी. देशमुख, देवपुर, धुळे या कंत्राटदारास काम देण्यात आले होते.
(२) श्री. नंदकिशोर मुंदडा यांनी दिनांक २५ मे, २०१७ रोजीच्या अर्जान्वये बाजार समितीच्या मार्केट यार्डात चालू असलेले रोडचे काम अंदाजपत्रकाप्रमाणे होत नसल्याने सदर काम रद्द न केल्यास आमरण उपोषण करणेबाबत तक्रार अर्ज केलेला होता. त्यानुषंगाने नोडल अधिकारी पीआययू (कृषि पणन) महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, पुणे यांनी प्रकल्पाच्या आदर्श गुणवत्ता धोरणानूसार व आवश्यक तांत्रिक मानकाप्रमाणे काम न झाल्यामुळे आणि तक्रार अर्जाच्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने बाजार समितीने कोणताही खुलासा सादर न केल्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई यांची निवड रद्द करुन बाजार समितीस कोणतेही अनुदान देय होणार नाही, असे दिनांक २४.१०.२०१८ रोजी कळविले होते.

(३) पणन संचालक, पुणे यांनी सदर प्रकरणाची चौकशी करण्याबाबत जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, बीड यांना दिनांक८.०६.२०२० रोजी कळविले होते. त्यानुषंगाने जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग -१ सहकारी संस्था, बीड यांचेंमार्फत चौकशी करण्यात आली. सदर रस्ता कामाचे मुल्याकंनाप्रमाणे रु.३६,३९,०३९/- एवढी रक्कम कंत्राटदारास अदा करण्याची शिफारस केली. त्यानुसार पणन संचालक यांनी दि.२६.७.२०२१ रोजीच्या आदेशान्वये अटींच्या अधीन राहून कंत्राटदारास देयक अदा करण्यास परवानगी दिली.
(४) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०९.१०.२०२१ रोजीच्या निवेदनान्वये जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांचेकडे बाजार समितीने रद्द केलेल्या रस्त्याच्या कामाचे बिल अदा करुन भ्रष्टाचार केल्याची तक्रार प्राप्त झाली आहे.
(५) सदर निवेदनाच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई यांचेमार्फत चौकशी करण्यात आली. त्यांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने बाजार समितीने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. २६ जुलै, २०२१ रोजीच्या पत्रातील अटी शर्तीचे उल्लंघन करुन सदर रस्ता कामाचे देयक अदा केलेले असल्याने बाजार समितीस देयकाची रक्कम रु. ३६,३६,०३९/- हि संबंधीताकडून वसूल करुन बाजार समितीच्या बँक खात्यात ७ दिवसाच्या आत जमा करण्याचे निर्देश जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांनी दि.३०.१०.२०२१ अन्वये दिले आहेत. बाजार समितीने सदर आदेशाविरोधात तत्कालीन मा. मंत्री (पणन) यांचेकडे अपील दाखल केले असून त्यास दि.११.११.२०२१ रोजी पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिलेली आहे.

---

**सोनबर्डी (ता.एरंडोल, जि. जळगांव) या गावाच्या पुनर्वसनाबाबत**

**(१२) ३५३०८ (१२-०१-२०२२). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोनबर्डी (ता.एरंडोल, जि. जळगांव) या गावाच्या पुनर्वसनाबाबतचा अहवाल तयार करण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी नाशिक येथील जळगाव जिल्हा आढावा बैठकीत निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्या निर्देशानुसार मौजे सोनबर्डी गावाच्या पुनर्वसन बाबतचा अहवाल उपायुक्त (पुनर्वसन) नाशिक विभाग यांचेमार्फत सचिव (मदत व पुनर्वसन) यांचेकडे दि.८ जुन, २०२० रोजी वा त्यासुमारास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतच्या प्रस्ताव सादर करण्याबाबत कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांना जलसंपदा विभागाने दि.१८ फेब्रुवारी, २०२१ रोजी व तदनंतर ०२ ऑगस्ट, २०२१ रोजी सूचना केल्या आहेत , हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरीसह निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०४-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) होय, हे खरे आहे.
तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांच्या दि.१२.११.२०२१ रोजीच्या ६५ व्या बैठकीतील ठराव क्र.६५.६ अन्वये सदर पुनर्वसीत गावठाणात मौ.सोनबर्डी, ता.एरंडोल हे गाव अंजनी मध्यम प्रकल्पामुळे बाधित होत नसुन, पुराच्या पाण्यामुळे बाधित असल्यामुळे पुर बाधितांच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव उपायुक्त, नाशिक यांनी शासन निर्णय दि.१०.०२.१९८३ नुसार तयार करुन मदत व पुनर्वसन विभागास सादर करण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी क्षेत्रातील आदिवासी आश्रम शाळांतील वर्ग तीन व चार पदावरील कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत

**(१३) ३५३४६ (१२-०१-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी क्षेत्रातील आदिवासी आश्रमशाळांतील वर्ग तीन व चार पदावरील कर्मचाऱ्यांना शासनसेवेत कायम करण्याबाबत सातत्याने मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयानेही याबाबत आपले मत नोंदवले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कर्मचाऱ्यांना शासनसेवेत कायम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०८-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) रिट याचिका क्र.७३५१/२०१२, रिट याचिका क्र.२१९४/२०१३, रिट याचिका क्र.२१९६/२०१३ व रिट याचिका क्र.५८६७/२०१५ प्रकरणी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी वर्ग-३ व वर्ग-४ पदावरील ज्या याचिकाकर्त्या कर्मचाऱ्यांची १० वर्षे सेवा पूर्ण झालेली आहे, अशा कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करण्याबाबत दि.३१.१०.२०१८ अन्वये आदेश देण्यात आले होते. तसेच सदर प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२०.०८.२०२१ रोजीच्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेश कायम केले आहेत.
त्यानुषंगाने मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी दि.३१.१०.२०१८ रोजी दिलेल्या आदेशातील नमूद बाबीची पुर्तता करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमितीकरणाचे लाभ देण्याबाबत आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि.१२.०४.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. त्यानुसार आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक तसेच संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातून अल्पवयीन मुली बेपत्ता होत असल्याबाबत

**(१४) ३५६२२ (०७-०१-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातून गेल्या सात महिन्यात ३१२ अल्पवयीन मुली बेपत्ता असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतापर्यंत ९३ मुली बेपत्ता आहे अशी माहिती मिळाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या मुलींचा शोध घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२३) :** (१) व (२) पुणे शहरात सन २०१९ मध्ये २८० मुली बेपत्ता होत्या. त्यापैकी २६७ मुली मिळुन आल्या आहेत.
यापैकी माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये ७५ मुली बेपत्ता होत्या त्यापैकी ७३ मुली मिळून आल्या आहेत.
(३) ट्रॅक द मिसींग चाईल्ड या वेब साईट वर माहिती भरून पूर्ण महाराष्ट्रातील इतर जिल्हयात शोध घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील पोलिस ठाणे व पोलिस उपविभागाच्या संरचनेत फेरबदल करण्याबाबत**

**(१५) ३६०४० (१०-०१-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील वाढती लोकसंख्या व रस्त्यामुळे बदलेल्या भौगोलिक रचना यासाठी पोलिस ठाणे व पोलिस उपविभागाच्या संरचनेत काही फेरबदल प्रस्तावित करण्याबाबत माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी घेतलेल्या आढावा बैठकीत दोन नविन पोलिस ठाणे व यवतमाळ शहरासाठी स्वतंत्र उपविभाग करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०३-२०२३) :** (१) व (२) यवतमाळ जिल्हयातील पोलीस ठाणे,पुसद ग्रा. चे विभाजन करून नवीन काळी दौलत पोलीस ठाणे व पोलीस ठाणे पांढरकवडा चे विभाजन करून मोहदा पोलीस ठाणे निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे.त्यापैकी मोहदा पोलीस ठाणे हे पोलीस ठाणे निर्माण करण्याचे विचाराधीन आहे, तर काळी दौलत पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव तसेच, पोलीस उपविभाग, यवतमाळ शहर व पोलीस उप विभाग, यवतमाळ ग्रामीण हे दोन उप विभाग निर्माण करण्याबाबतचा प्रस्तावही शासन स्तरावर प्राप्त झालेला नाही.

उपरोक्त प्रस्ताव पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर वित्त विभागाच्या मान्यतेने पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातील अनधिकृतपणे बोगस अपंग शाळा सुरू असल्याबाबत**

**(१६) ३६४१६ (१२-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात अनधिकृतपणे अपंग शाळा मोठ्या प्रमाणात असून सदर शाळांचे संस्थापक व अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमताने शासनाच्या निधीचा अपव्यव होत असून शासनाचे यात करोडो रुपयांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकणाची तक्रार तेथील स्थानिक नागरीकांना व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विकास मंचाचे संस्थापक यांनी अपंग कल्याण आयुक्त, पुणे यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यासुमारास दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) बीड जिल्ह्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळा/कार्यशाळांच्या बाबतीत आयुक्त, दिव्यांग कल्याण यांना प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शाळांची सविस्तर तपासणी करुन तपासणी अहवालावर सर्व संबंधीतांची सुनावणी घेवून योग्य ते आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांच्या स्तरावर सुरु आहे.

(४)असल्यास, शासनाने सदर अनधिकृत अपंग शाळांचे संस्थापक व अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०४-२०२२) :** (१) नाही.

(२) होय.

(३) बीड जिल्ह्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांच्या संदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने संबंधीत शाळा/कर्मशाळांची तपासणी तत्कालीन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, सोलापूर यांच्या मार्फत करण्यात आली. व तपासणीत निदर्शनास आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने संबंधीत संस्था, जिल्हा कार्यालय यांचेसमवेत सुनावणी

घेण्यात येऊन त्यापैकी १३ शाळांचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्याची कार्यवाही दिव्यांग कल्याण आयुक्तालयाच्या स्तरावरुन करण्यात आलेली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील दिव्यांग व्यक्ती कायद्या अंतर्गत नोंदणीकृत विशेष शाळांना कायमस्वरुपी अनुदान देण्याबाबत

**(१७) ३६४३० (१२-०१-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दिव्यांग व्यक्ती कायद्या अंतर्गत नोंदणीकृत विशेष शाळांना कायमस्वरुपी अनुदान देण्यासाठी सहा महिन्यात धोरण निश्चित करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शासनास दिला असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी विशेष शाळांना कायमस्वरुपी अनुदान मंजुर करताना राज्य सरकार मनमानी पद्धतीने वागत असल्याचे उच्च न्यायालयाच्या सुनावणी दरम्यान आढळून आले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाने दिनांक ८ एप्रिल २०१५ रोजी व त्या दरम्यान निर्णयाद्वारे १२३ विशेष शाळांना कायमस्वरुपी अनुदान दिले असुन सन २०१९ मध्ये तीन शाळांना कायमस्वरुपी अनुदान मंजूर केले परंतू या विषयी शासनाने अद्यापर्यंत निर्धारीत केले नाहीत, हे ही खरे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशित काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथील दाखल रिट याचिका क्र.३०५१/२०१९ खटेश्वर मागासवर्गीय बहु.व्यवसायिक शिक्षण संस्था, अमरावती विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दि.०६.०९.२०२१ रोजीच्या आदेशान्वये विशेष शाळांना कायमस्वरुपी अनुदान देण्यासाठी सहा महिन्यात धोरण निश्चित करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) सदरहू प्रकरणी शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

---

## महावितरण विभागाअंतर्गत कोकण, पूणे, नागपूर या प्रादेशिक कार्यालयातील सह व्यवस्थापकीय संचालक व प्रादेशिक संचालक पद भरण्याबाबत

**(१८) ३९३१५ (३१-०३-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महावितरण विभागाअंतर्गत कोकण, पूणे, नागपूर या प्रादेशिक कार्यालयातील महत्वाचे प्रमुख पद सह व्यवस्थापकीय संचालक व प्रादेशिक संचालक पद प्रभारी म्हणून काम करीत असल्याचे दि. ३० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महावितरण व्दारे नियमित प्रशासकिय पदावर शासन तातडीने नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०४-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
महावितरण कंपनीमध्ये कार्यकारी संचालक / प्रादेशिक संचालकाची एकूण ८ पदे मंजुर असून त्यापैकी प्रादेशिक कार्यालय - औरंगाबाद व कोकण या ठिकाणी भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची नियुक्ती शासनाकडून करण्यात येते. सद्यस्थितीत औरंगाबाद व कोकण येथील प्रादेशिक संचालक हे पद भरलेले असून उर्वरित पुणे, नागपूर येथील प्रादेशिक कार्यालयातील पदांचा अतिरिक्त कार्यभार स्थानिक अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला आहे.
(२) छोट्या संवर्गातील मागासवर्गियांकरीता आरक्षीत पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१.०८.२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये विहित करण्यात आली होती. सदर परिपत्रकास सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि. २२.०८.२०१९ नुसार स्थगिती देण्यात आली आहे. सद्या छोट्या संवर्गातील सरळ सेवा पदे भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २५.०२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये कार्यपध्दती विहित करण्यात आली असून त्यानुसार महावितरण कंपनीतील रिक्त असलेली कार्यकारी संचालक व प्रादेशिक संचालकाची पदे भरण्याबाबतचा निर्णय महावितरण कंपनीस्तरावर घेण्याचे नियोजित आहे.
(३) लागू नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील शेतक-यांना पिक कर्ज वाटप करण्याबाबत.

**(१९) ३९४५७ (०९-०४-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील खरीप पिक कर्ज वितरणामध्ये घट होऊन मागीलवर्षी केवळ ५० टक्के शेतक-यांना राष्ट्रीयकृत, सहकारी व खाजगी बँकांनी पिक कर्ज दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, साडेचार लाखांच्यावर शेतक-यांना पिक कर्ज मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पिक कर्जापासून वंचित असणाऱ्या शेतक-यांना कर्ज मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?
**श्री. अतुल सावे (३१-०३-२०२३) :**(१) व (२) परभणी जिल्ह्यातील खरीप हंगामासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक परभणी, व्यापारी व खाजगी बॅंक व महाराष्ट्र ग्रामीण बॅंकांसाठी सन २०२०-२१ मध्ये एकुण रु.१५६७.२० कोटी पीक कर्ज वाटपाचा लक्षांक देण्यात आला होता. त्यानुसार बॅंकांनी १,५२,१०१ शेतकऱ्यांना रु.१०४६.४५ कोटीचे पीक कर्ज वाटप केले आहे. (फक्त ६६.७७%)
(३) जिल्हाधिकारी, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली DLCC सभा वारंवार घेण्यात आल्या आहेत.सदर सभामध्ये बॅंकांना कर्ज वाटपाचा लक्षांक पुर्ण करण्याबाबत तसेच पीक कर्ज घेण्यास पात्र शेतकरी पीक कर्जापासुन वंचित राहू नये याबाबत खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावकारी कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत वाढ होत असल्याबाबत

**(२०) ३९५८३ (०९-०४-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या व बँकांच्या निष्क्रिय धोरणामुळे राज्यात बँकांनी उद्दिष्टाप्रमाणे पीक कर्ज वाटप केलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यभरात खाजगी सावकारी कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येमध्ये प्रचंड वाढ झाल्याचे माहे, जानेवारी २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हानिहाय बँकांनी किती पीककर्ज वाटप करण्याचे उद्दिष्ट गाठलेले आहे, तसेच जिल्हानिहाय किती खाजगी सावकारी कर्ज प्रकरणे झाली,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (३१-०३-२०२३) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) सन २०२१-२२ मधील पीककर्ज वाटपासाठी राज्यस्तरीय बँकर्स समितीने राज्यातील सर्व बँकांना रु.६०,८५९.४८ कोटीचे उद्दीष्ट्य दिले होते, त्यापैकी रु.४८,९०८.८७ कोटीचे कर्जवाटप करण्यात आले आहे. (लक्षांकाच्या ८०% इतके). तसेच राज्यातील ३५५४२ शेतकऱ्यांना रु.४०.७८ कोटीचे कर्जवाटप, परवानाधारक सावकारांनी केले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाळीसगाव तालुक्यात ढगफुटीसदृश्य अतिवृष्टी व गुलाब चक्रीवादळामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत

**(२१) ३९६८५ (३१-०३-२०२२). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव, पाचोरा, भडगाव (जि.जळगाव) कन्नड तालुका (जि.औरंगाबाद) व नांदगाव तालुका (जि.नाशिक) येथे माहे ऑगस्ट, व सप्टेंबर, २०२१ मध्ये झालेल्या ढगफुटीसदृश्य अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात हजारो हेक्टर जमीन आलेल्या महापुरात वाहून गेल्या असुन चाळीसगाव तालुक्यातील बहुतांश गावांतील शेतामध्ये पाणी साचल्याने कपाशी, ऊस, मका, ज्वारी - बाजरी आदी सर्वच पिकांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तितूर व डोंगरी नदीला दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास पाचव्यांदा पुर आल्यामुळे शहरातील दुकानांमध्ये पाणी शिरले, तसेच ढगफुटीसदृश्य पाऊस व गुलाब चक्रीवादळाचा मोठा तडाखा तालुक्याला बसला असून त्याचदिवशी २४ तासात ४४५ मिमी पाऊस झाल्याने मंगळवार अखेर ११०२.१३ पर्जन्यमान झालेले होते व अतिवृष्टीमुळे उरल्या - सुरल्या खरीप पिकांचे नुकसान झाल्याने शेतक-यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चाळीसगाव तालुक्यात सर्वच पिकांचे १०० टक्के नुकसान झालेले असून अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पिकपेरा निहाय सरसकट पंचनामे करून, तसेच चाळीसगाव तालुक्यासह संपुर्ण जळगाव जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०४-२०२३) :** (१) अशंत: खरे आहे.
(२) होय.
(३) ऑगस्ट व सप्टेंबर, २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित क्षेत्राच्या नुकसानीसाठी शासन निर्णय दि.२१.१०.२०२१ अन्वये वाढीव दराने मदत अनुज्ञेय करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार नाशिक जिल्ह्यातील नांदगाव, जळगांव जिल्ह्यातील चाळीसगांव, पाचोरा व भडगांव तसेच औरगांबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी शासन निर्णय दि.२६.१०.२०२१, दि.२७.१०.२०२१, दि.१६.२.२०२२ व दि.३१.३.२०२२ अन्वये मदत अनुज्ञेय करण्यात आली असून त्यामध्ये वरील तालुक्यांचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील बँकांद्वारे रब्बी हंगामाचे कर्ज वाटप विहीत वेळेत पूर्ण केले नसल्याबाबत**

**(२२) ३९९४० (०९-०४-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात राष्ट्रीयकृत बँकांद्वारे रब्बी हंगामाचे पीककर्ज विहीत वेळेत पूर्ण केले नसल्याचे माहे नोव्हेंबर,२०२१मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रब्बी हंगामासाठी सुमारे ९६ हजार शेतकऱ्यांना ६४८ कोटी रुपयांचे कर्ज वाटपाचे लक्षांक असताना केवळ २ टक्केच म्हणजे १० कोटी रुपये पीककर्ज वाटप करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास , पीककर्ज वाटप विहीत मुदतीत पूर्ण होण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२९-०४-२०२३) :**(१) नाही.

(२) नाही.

(३) अमरावती जिल्ह्यात सन २०२१-२२ मध्ये ऑक्टोबर ते मार्च या कालावधीसाठी राष्ट्रीय बॅंका, जिल्हा मध्यवर्ती बॅंक व ग्रामीण बॅंक यांचा एकुण रब्बी कर्जवाटपाचा लक्षांक रु.६४८.८९ कोटी इतका होता. त्यापैकी फक्त राष्ट्रीयीकृत बॅंकांना रब्बी कर्जवाटपाचा लक्षांक रु.३४४.८९ कोटी इतका देण्यात आला होता. सदर बॅंकांनी २६,३८२ खातेदारांना रु.२९३.८२ कोटी कर्जवाटप केले आहे.(टक्केवारी- लक्षांकाच्या ८५%)

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील मौ.बाऱ्हाळी (ता.मुखेड) व मौ.कुरुळा (ता.कंधार) येथे नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत**

**(२३) ४२०६६ (१२-०४-२०२२). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील मौ.बाऱ्हाळी (ता.मुखेड) व मौ.कुरुळा (ता.कंधार) येथे पोलिस ठाणे निर्माण करण्याची आवश्यकता असल्याने नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याच्या दृष्टिकोनातून पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२३) :**(१) व (२) शासन निर्णय, गृह विभाग दि.२३/१/१९६० व दि.४/५/२०११ नुसार प्रस्तावित पोलीस स्टेशनच्या गुन्हयांची सरासरी कमी असल्याने मौ.बा-हाळी व मौ.कुरुळा येथे नवीन पोलीस स्टेशन निर्माण करणे उचित होणार नाही, असे पोलीस अधिक्षक, नांदेड यांनी पोलीस महासंचालक कार्यालयास कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोळसेवाडी (जि.ठाणे) पोलीस स्टेशनमधील अधिकारी व कर्मचारी यांची पदे वाढविण्याबाबत**

**(२४) ४२२८३ (०७-०४-२०२२). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील पोलीस आयुक्तालय हद्दीमधील कोळसेवाडी पोलीस स्टेशन मधील अधिकारी व कर्मचारी यांची पदे वाढविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कोळसेवाडी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये वाढती लोकसंख्या व शहरीकरणामुळे गुन्हेगारी वाढत असुन अपुऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संख्येमुळे परीसरातील गुन्हेगारीला आळा बसण्याकरिता पोलिसांना कसरत करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी वाढत्या लोकसंख्या व शहरीकरण विचारात घेता शासनाने कर्मचारी संख्या वाढविण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०३-२०२३) :** (१) होय.
(२) व (३) नाही.
कोळसेवाडी पोलीस ठाणेकरीता १० अधिकारी व १३४ पोलीस अंमलदारांची पदे मंजूर असून, प्रत्यक्षात तेथे १७ पोलीस अधिकारी व १४७ पोलीस अंमलदार कार्यरत आहेत.
उपरोक्त उपलब्ध मनुष्यबळाव्दारे कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे हद्दीत कायदा व सुव्यवस्था योग्य पध्दतीने हाताळली जात असून, भविष्यात आवश्यकतेनुसार मनुष्यबळ वाढविण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोफाळी (जि.यवतमाळ) येथील पोलिस स्टेशन अंतर्गत अवैध गैरकारभार होत असल्याबाबत**

**(२५) ४३१३३ (१२-०४-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोफाळी (जि.यवतमाळ) येथील पोलिस स्टेशन अंतर्गत अवैध गैरकारभार रोखण्यासाठी माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान कारवाई करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी मागील चार वर्षापासून वसंत सहकारी साखर कारखाना बंद असल्याने या परिसरातील बेरोजगारीचे प्रमाण वाढल्याने जुगार आणि मटका तसेच गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याकरिता तसेच तरुणांना रोजगार उपलब्ध होण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२३) :** (१) होय.
यवतमाळ जिल्हयातील पोलीस स्टेशन पोफाळी अंतर्गत अवैध व्यवसाय करणा-या इसमांविरुध्द माहे फेब्रुवारी २०२२ मध्ये खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.
माहे फेब्रुवारी २०२२

| प्रकार | केसेस | आरोपी | जप्त माल |
|---|---|---|---|
| अवैध जुगार | ७ | १३ | ५६२५ |
| अवैध दारु | २५ | २५ | ४९२९० |

(२) नाही.
पोलीसांना प्राप्त माहितीच्या आधारे अवैध व्यवसांयावर वेळीच छापे टाकून प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येते.
(३) कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्याकरीता पोलीस स्टेशन परिसरात वेळोवेळी प्रबोधनपर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. परिसरातील तरुणांना पोलीस मित्र बनवून त्यांचेशी समन्वय ठेवण्यात येत आहे.

तसेच तरूणांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय करिअर सेवा पोर्टल सुरू केले आहे. त्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास संस्थेमार्फत एकात्मिक महास्वयंम् वेबपोर्टल विकसित करण्यात आले आहे. तसेच शासनामार्फ़त बेरोजगार तरूणांसाठी ग्रंथालय सदृश्य अभ्यासिका निर्माण करणे, रोजगार मेळावे आयोजित करणे, रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम, ऑनलाईन समुपदेशन करणे, व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र स्थापन करणे, किमान कौशल्य विकास कार्यक्रम अशा अनेक योजना राबविल्या जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत प्राप्त शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत**

**(२६) ४३४९७ (०९-०४-२०२२). श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान २०१७ या योजनेअंतर्गत उमरेड, कुही व भिवापूर तालुक्यातील बँक शाखा निहाय कर्जमाफीस पात्र शेतकऱ्यांची संख्या व रक्कम यांची यादी देण्यात आली नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने बँक मुख्यालयास प्रदान केलेली पात्र कर्ज रक्कम सबंधित बँक शाखांना आजपोवतो मिळाली नाही, तसेच यापैकी किती रक्कम सबंधित बँक शाखेस प्राप्त झाली आहे याची शेतकरी निहाय यादी बँक शाखांना देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान २०१७ योजनेअंतर्गत एक वेळ समझोता (One Time Settlement) बँकनिहाय पात्र शेतकऱ्यांची यादी बँक शाखेला देण्यात आली नाही हे खरे आहे काय,
(४)असल्यास, पात्र शेतकऱ्यांपैकी किती शेतकऱ्यांस कर्जमाफीची रक्कम अद्यापही अप्राप्त असून शेतकऱ्यांना तातडीने रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (३१-०३-२०२३) :**(१) नाही.
(२) नाही.
(३) नाही.
(४) उमरेड, कुही व भिवापूर तालुक्यात राष्ट्रियीकृत बँकेच्या ३९ शाखा व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १४ शाखा आहेत.सदर बँकांमार्फत रु.१.५ लाख मर्यादेपर्यंतचे कर्ज असलेल्या ११,७५२ पात्र शेतकऱ्यांना सुमारे रु.७६.९२ कोटीच्या कर्जमाफीचा लाभ देण्यात आला आहे. तसेच रु.१.५० लाखपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या १२४८ पात्र शेतकऱ्यांना एक वेळ समझोता योजनेअंतर्गत रु.१३.०५कोटीच्या कर्जमाफीचा लाभ देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात शासनाने वितरित केलेल्या निधीपैकी ५% निधी अंपगाकरीता राखीव ठेवण्याबाबत**

**(२७) ४३८३३ (०९-०४-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील अपंग बांधवांकरीता राज्य शासनाकडून विविध योजनांकरीता वितरीत करण्यात आलेल्या निधीपैकी ५% निधी अपंग बांधवांकरीता राखीव ठेवून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.कोल्हापूर व आयुक्त महानगरपालिका, कोल्हापूर यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदरील निवेदनाच्या अनुषंगाने संबंधीत कार्यालयाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ,
(३) असल्यास,मागणीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०९-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

मा.प्रकाश आबिटकर वि.स.स. यांनी त्यांचे पत्र दि.२२.०२.२०२१ नुसार दिव्यांग बांधवांसाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीच्या प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत आयुक्त, महानगरपालिका कोल्हापुर यांना कळविलेले आहे.

(२) कोल्हापुर महानगरपालिकेकडुन दिव्यांगांकरिता ५ टक्के राखीव निधी ठेवून शहरातील दिव्यांग बांधवाकरीता विविध योजनेव्दारे सदर निधीचा लाभ दिला जातो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर येथील वीज प्रकल्पांना भुकटी मिश्रीत कोळसा पुरविण्यात येत असल्याबाबत

**(२८) ४३९५२ (०९-०४-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील वीज प्रकल्पांना भुकटी मिश्रीत कोळसा पुरविण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय ,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणात दोषी आढळून आल्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) कोळसा कंपनीव्दारे पुरवठा करण्यात येणाऱ्या कोळशात सर्वसाधारणपणे १५ ते २० % कोळशाची भुकटी असते. याचा आकार ३ मि.मी. च्या आतील असतो. कोळसा वाहतूक, वॅगन मध्ये पेलोडरने भरणे, तो वीज केंद्रात वॅगन टिपलरने उतरवणे या यांत्रिक प्रक्रिये दरम्यान विखंडन होऊन कोळशाची बारीक पावडर (भुकटी) तयार होत असते. तथापि, यापेक्षा जास्त निव्वळ भुकटी असलेला कोळसा पुरवठा झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

तसेच, कच्चा कोळशाचे विश्लेषण CIMFR या नामांकित सरकारी संस्थेतर्फे करण्यात येते मात्र त्यातही भुकटी मिश्रित कोळसा पुरवठा झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कर्ज घेतलेल्या सहकारी साखर कारखाने, सुत गिरण्या आणि इतर सहकारी संस्थांकडे थकीत असलेले कर्ज एक रक्कमी परतफेड करता यावे याकरीता अभ्यासगट स्थापन करण्याबाबत

**(२९) ४४६३२ (२१-०९-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी बँक आणि राज्यातील जिल्हा बँकाकडून कर्ज घेतलेल्या सहकारी साखर कारखाने, सुत गिरण्या आणि इतर सहकारी संस्थांकडे थकीत असलेले कर्ज एक रक्कमी परतफेड (वन टाईम सेटलमेंट) करता यावे याकरीता शासनाने स्वतंत्र योजना अंमलात आणण्यासाठी अभ्यासगट स्थापन केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अभ्यासगट कोणाच्या अध्यक्षतेखाली निर्माण करण्यात आला आहे व त्याचे सदस्य कोण आहेत,

(३) असल्यास, सदर अभ्यासगट स्थापन करणाच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत, त्याबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (३१-०३-२०२३) :** (१) होय.
(२) व (३) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दि.१७/०३/२०२२ च्या शासननिर्णयाद्वारे खालीलप्रमाणे अभ्यासगट स्थापन करण्यात आला आहे.

| अ.क्र | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे. | अध्यक्ष |
| २ | साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे | सहअध्यक्ष |
| ३ | पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ४ | प्रशासक/ कार्यकारी संचालक, दि महाराष्ट्र राज्य सहकारी | सदस्य |
| ५ | मुख्य कार्यकारी अधिकारी सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सांगली | सदस्य |
| ६ | अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्तालय, पुणे. | सदस्य सचिव |

---

**पुणे येथील फिर्यादीची कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार कार्यवाही होत नसल्याबाबत**

**(३०) ४४९६३ (२८-१०-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील इसम भानुदास विठ्ठल रायकवाड यांची सहकारनगर पोलीस ठाणे येथे दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास दाखल केलेल्या प्रथम खबर अहवालावर कलम १५४ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहितानुसार कार्यवाही होत नसल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इसम यांनी दाखल केलेल्या एफआयआरमध्ये त्यांची जमीन खरेदीमध्ये फसवणूक झाल्याप्रकरणी कायदेशीर तक्रार दाखल असताना तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास सहकारनगर आणि स्वारगेट पोलीस ठाण्याकडून कार्यवाही न झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सदरहू तक्रारीवर होणाऱ्या कार्यवाहीच्या विलंबाच्या अनुषंगाने फिर्यादीच्या जागेवर सन १९८५ पासून रहिवासात असलेले जमिनीच्या क्षेत्रावर बेकायदेशीर ताबा घेण्याची शक्यता असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२३) :** (१), (२), (३) व (४) फिर्यादी यांनी तक्रार अर्ज दिल्याने अर्ज चौकशीवरुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५४ अन्वये दि.२३/०९/२०२१ रोजी सहकारनगर पोलीस ठाणे, पुणे शहर गुन्हा रजि. नं. २५१/२०२१ भा.दं.वि. कलम ४२०,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी उपरोक्त प्रमाणे गुन्हा दाखल केलेला असुन सदर गुन्हयाचा तपास चालु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिंदखेडा (जि.धुळे)पीककर्ज वेळेत मिळत नसल्याने वाढलेल्या आत्महत्यांबाबत**

**(३१) ४५०२६ (२१-०९-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयातील शिंदखेडा तालुक्यात शेतकऱ्यांना पीककर्ज मिळण्यासाठी विविध बँकाकडून अडवणुक होत

असल्याने शेतकरी कर्जबाजारी होवून आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याचे माहे मे जून, २०२२ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिंदखेड तालुक्यातील एकाच कुटूंबातील दोन सख्या भावांनी पीककर्ज न मिळाल्यामुळे कर्जबाजारीपणाला कंटाळुन आत्महत्या केल्याची घटना माहे एप्रिल २०२२ मध्ये वा त्या सुमारास घडली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहु पीक कर्ज मंजूर करतांना स्टेट बँकेच्या नरडाणा शाखेकडून फाईल मंजूरीसाठी धुळे येथे पाठविण्यात येते तर मालपूर सेंट्रल बँकेत देखील माहे जून २०२२ पर्यंत ४ महिन्यापासुनच्या फाईल्स तशाच पडून असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतक-यांना पीककर्ज तातडीने मिळण्यासाठी व शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (३१-१०-२०२३) :**(१) नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) नाही.
(४) धुळे जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना सर्व बॅंकांमार्फत प्राधान्याने पीक कर्ज वाटप करण्यात येते. सदर बाबतीत तक्रार प्राप्त झाल्यास सदर तक्रारीचे निवारण होणेकामी संबंधित बॅंकेचे जिल्हा समन्वयक यांचेमार्फत सदरची तक्रार संबंधित बॅंकांना तात्काळ वर्ग करण्यात येते.तसेच जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय बॅंकर्स समन्वय समिती धुळे यांचेकडून पीक कर्जवाटप लक्षांक पुर्ततेबाबत आढावा नियमितपणे घेण्यात येतो. सन २०२२-२३ मधील धुळे जिल्हयासाठीचा खरीप हंगामाचा पीक कर्ज वाटपाचा लक्षांक रु.७१३.०१ कोटी इतका होता. त्यापैकी दि.३०.०६.२०२२ पर्यंत रु.३६८ कोटी चे पीक कर्जवाटप करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात प्रत्येक महिन्यात पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात तीन ते चार बेवारस मृतदेह आढळून येत असल्याबाबत

**(३२) ४५२९७ (२८-१०-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात प्रत्येक महिन्यात पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात तीन ते चार बेवारस मृतदेह आढळून येत असल्याचे दिनांक २ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बेवारस मृतदेहांची विल्हेवाट लावण्यापूर्वी त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेणे, त्यासाठी मृताचा फोटो काढणे, शववाहिनी आणणे, अंत्यसंस्कार विधी आदीची जबाबदारी संबंधित पोलीस कर्मचाऱ्यावर येते, अशावेळी प्रत्येकी मृतदेहामागे पोलिसांना स्वतःचे ७०० ते १५०० रुपये खर्च करावे लागत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२३) :** (१),(२) व (३) नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात सन २०२२ या वर्षात ऑक्टोबर, २०२२ अखेर एकूण १६७ बेवारस मृतदेह आढळून आले आहेत.
सदरहू बेवारस मृतदेहांची विल्हेवाट लावण्यापूर्वी त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेणे, त्यासाठी मृताचे फोटो काढणे, शववाहिनी आणणे, अंत्यसंस्कार विधी आदीकामासाठी प्रत्येक मृतदेहामागे पोलीसांना ७०० ते १५०० रूपये खर्च

करावे लागतात. परंतु त्याकरीता होणारा खर्च गुन्हे तपास निधीमधून परत देण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## निराधारांना उत्पन्नाचा दाखला जमा करणे बंधनकारक करण्यात आले असल्याबाबत

**(३३) ४५३९७ (२३-०९-२०२२). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विशेष सहाय्य योजनेच्या लाभासाठी दरवर्षी जूनपर्यंत निराधारांना उत्पन्नाचा दाखला जमा करणे बंधनकारक करण्यात आले असून तो न दिल्यास शासनाकडून दिले जाणारे अर्थसहाय बंद करण्यात येत असल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शानास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू उत्पन्नाचा दाखल विहित मुदतीत मिळविण्याकरिता निराधारांची पिळवणूक होत असून, लातूर जिल्हयातील सुमारे ०१ लाख ३० हजार निराधारांना याचा त्रास सहन करावा लागल्याने उत्पन्न दाखल्याची जाचक अट रदद करण्याची मागणी सर्वत्र होत असून त्यायोगे दि.२८ जून, २०२२ रोजीपासून मोर्चा काढण्याचा इशारा निराधार संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निराधारांना उत्पन्नाचा दाखला वेळेत मिळवून देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०३-२०२३) :** (१) विभागाच्या दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निणर्यातील परिशिष्ट-६, (क) मध्ये विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थी यांच्याकडून दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यानंतर एप्रिल ते जून या कालावधीत उत्पन्नाचा दाखला घेणे सक्तीचे राहील अशी तरतूद आहे. परंतु लातूर जिल्हयात अद्याप एकही लाभार्थ्याचे अनुदान बंद करण्यात आले नाही.
(२) अशा आशयाचे निवेदन दिले आहे, हे खरे आहे.
(३) लाभार्थ्यांना उत्पन्नाचा दाखला जलद गतीने मिळावा म्हणून गावोगावी तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यामार्फत शिबिरे आयोजित करुन उत्पन्नाचे दाखले देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्याचे जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी सर्व वर्ली मटका चालकांना मटका चालविण्याचे निर्देश दिल्याबाबत

**(३४) ४५९४१ (२८-१०-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्याचे जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी त्यांच्या दालनात माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान सर्व वर्ली मटका चालकांना बोलावून हप्ता देऊन मटका चालविण्याचे खुले निर्देश दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जिल्ह्यात मटका चालविण्याचे काम सुरु असल्याने शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी त्यात गुंतल्याने यांच्या कुंटुंबाची आर्थिक, मानसिकरीत्या कुचंबना होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२३) :** (१), (२), व (३) हे खरे नाही.

तथापि, पोलीस उपमहानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी अकोला घटकातील सर्व ठाणेदार, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्यासमवेत दिनांक ०१.०७.२०२१ रोजी बैठक आयोजित करून सदर बैठकीमध्ये जुगार, वरली मटका, दारुबंदी, गुटखा, वाळू तस्करी अशा अवैध धद्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत तसेच, अवैध धंदे करण्या-या व्यक्ती विरुद्ध परिणामकारक प्रतिबंधक कारवाई करण्याबाबत सूचित केले असून दिनांक ०८.०७.२०२१ व दि. ०१.११.२०२१ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये सदर बाबत पोलीस अधिक्षक, अकोला यांना सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे शिरगाव (ता.शहापूर, जि.ठाणे ) येथील जांभे लघुपाटबंधारे योजनेअंतर्गत सुरु असलेल्या उजवा कालवा कामासंदर्भात

**(३५) ४६१६३ (०९-१०-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिरगाव (ता.शहापूर, जि.ठाणे ) येथील जांभे लघुपाटबंधारे योजनेअंतर्गत सुरु असलेल्या उजवा कालवा कामासंदर्भात जलसंपदा तथा लाभक्षेत्र विकास राज्यमंत्री यांनी माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान जलसंपदा विभागाच्या उपसचिवांना चौकशीचे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी उपसचिवांमार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय तसेच अहवालाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०४-२०२३) :** (१) होय, तत्कालीन राज्यमंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास यांचे दि.३१ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रासोबतच्या दि.२२/०३/२०२२ रोजीच्या निवेदनावर नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत उप सचिव (जलसंपदा) यांना निर्देश प्राप्त आहेत.

(२) दि.३१ मार्च, २०२२ रोजीचे तत्कालीन राज्यमंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास यांचे पत्र व त्यासोबतचे निवेदन कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांना दि.१३ मे, २०२२ रोजी पाठविण्यात आल्यानंतर अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे यांनी कार्यकारी अभियंता, भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसा नगर यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे.

(३) चौकशी अधिकारी यांनी दि.१४.०६.२०२२ रोजी कार्यक्षेत्राच्या केलेल्या पाहणीच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे यांच्याकडे सादर केलेल्या अहवालानुसार शिरगाव उजवा कालवा साखळी क्र.० ते १६०० मी. व डावा कालवा साखळी क्र.० ते १२०० मी. मधील कालवा नुतनीकरण व दुरूस्तीचे काम सुस्थितीत असून सदर कामात कोणताही गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास येत नसल्याचे नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कु-हा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथील पोलिस ठाण्याची निर्मिती करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(३६) ४७६८३ (२८-१०-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुऱ्हा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथील ४२ गावे, लगत असलेली मध्यप्रदेश व विदर्भाची सिमारेषा तसेच वढोदा वनपरिक्षेत्रातील विस्तीर्ण क्षेत्रात गोरगरीब आदिवासी कुंटुंबाचे वास्तव्य असून गेल्या अनेक वर्षापासून मांडूळ तस्करी, वन्य जीवांची व अवयवांची तस्करी, रस्ता लूट यासारख्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता कुऱ्हा दूरक्षेत्र पोलिस ठाण्याची निर्मिती करण्यात यावी याकरिता प्रस्ताव सादर केला असूनही यासंदर्भात शासनाने अद्याप निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भातील प्रस्ताव मंजूर करण्यांसदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०३-२०२३) :** (१) मागील १० वर्षात या परिसरात मांडूळ तस्करी,वन जिवांची व अवयवांची तस्करी,रस्ता लूट/मालमत्तासाठी केलेली दुखापत यासारख्या गुन्हयांची सदरहू पोलीस ठाणेच्या अभिलेखानुसार माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | प्रकार | वर्ष | दाखल गुन्हे |
|---|---|---|---|
| १ | मांडूळ तस्करी | २०१२ ते २०१८ पर्यंत, २०२० व २०२२. | निरंक |
| | | २०१९ व २०२१ | प्रत्येकी १ |
| २ | वन जिवांची व अवयवांची तस्करी | २०१२ ते २०२२ पर्यंत. | निरंक |
| ३ | रस्ता लूट/मालमत्तासाठी केलेली दुखापत | २०१२ व २०१३ | प्रत्येकी ०२ |
| | | २०१४ | ०४ |
| | | २०१५ | ०६ |
| | | २०१६ व २०१७ | प्रत्येकी ०२ |
| | | २०१८ | ०४ |
| | | २०१९ | ०७ |
| | | २०२० | ०६ |
| | | २०२१ | ०५ |
| | | २०२२ | ०१ |

(२) व (३) कुऱ्हा दूरक्षेत्राचे पोलीस ठाणेमध्ये रूपांतर करणेबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर अद्याप अप्राप्त असून, तो प्राप्त झाल्यानंतर वित्त विभागाच्या मान्यतेने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात वीज बचतीसाठी मोहिम हाती घेण्याबाबत

**(३७) ४७८८२ (१४-१०-२०२२). अ‍ॅड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासकीय कार्यालयांमध्ये सर्रासपणे विजेचा अपव्यय होत असल्याचे प्रकार समोर येत असून कार्यालयात अधिकारी, कर्मचारी कुणीही हजर नसताना लाईट व पंखे सर्रासपणे सुरु असल्याचे दिनांक २९ मार्च,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती जिल्हयात सध्या महावितरणकडून वीज देयक वसूली मोहिम हाती घेण्यात आली, तशीच वीज बचतीसाठी मोहिम हाती घेण्याची गरज आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विजेचा अतिरिक्त वापर टाळल्यास, ती रक्कम अन्य विकासात खर्च करुन याच बचतीतून अनेक कामांना गती मिळू शकते, यासाठी शासनस्तरावर काय कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०३-२०२३) :** (१) सांगली येथील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयामध्ये कुणीही नसताना पंखे व ट्युब सुरू असल्याची बातमी दिनांक ३०.०३.२०२२ रोजीच्या दैनिक लोकमत मध्ये आली होती.
(२) व (३) अमरावती जिल्हयात सध्या महावितरणकडून वीज देयक वसुली मोहिम हाती घेण्यात आलेली आहे. अमरावती मंडळ कार्यालयाअंतर्गत, तसेच महावितरणच्या महाराष्ट्रातील इतर कार्यक्षेत्रात वेळोवेळी विविध अभियानाअंतर्गत ग्राहकांना वीज बचतीबाबत प्रबोधन करण्यात येते.

राज्यामध्ये ऊर्जेचा अधिक कार्यक्षमतेने वापर करण्याच्या दृष्टीने राज्यातील शासकीय/निमशासकीय इमारतींचे ऊर्जा परीक्षण व ऊर्जा परीक्षणाअंती प्राप्त संभाव्य वाव विचारात घेता राज्य तसेच केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून अकार्यक्षम उपकरणे ऊर्जा कार्यक्षम उपकरणांनी महाऊर्जामार्फत बदलले जातात. शासकीय/निमशासकीय कार्यालयांमध्ये ऊर्जा बचतीच्या दृष्टीने जनजागृती करण्यासाठी ऊर्जा संवर्धन विषयीचे पोस्टर्स, बॅनर लावले जातात. तसेच ऊर्जा संवर्धन दिन व सप्ताहादरम्यान विविध उपक्रम राबविले जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे, पालघर, नाशिक, रायगड आदी जिल्ह्यातील आदिवासी भागात राहणाऱ्या आदिवासींना मूलभूत अधिकार, वनजमिनीचे पट्टे मिळण्याबाबत

**(३८) ४७९४५ (१३-१२-२०२२). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे, पालघर, नाशिक, रायगड आदी जिल्ह्यातील आदिवासींच्या विविध नागरी वस्तीमध्ये वास्तव्य करणाऱ्या हजारो आदिवासींना मूलभूत अधिकार व वनजमिनीचे पट्टे मिळाले नसल्याचे माहे मार्च, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे, काय,
(२) असल्यास, ठाणे, पालघर, नाशिक, रायगड आदी जिल्ह्यातील आदिवासी भागात राहणाऱ्या आदिवासींना मूलभूत अधिकार व वनजमिनीचे पट्टे मिळण्याबाबत व इतर मागण्या तातडीने मान्य करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२२-०३-२०२३) :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

श्रमजीवी संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी अनूसूचित जमातीच्या मुलभूत अधिकार व इतर मागण्याबाबत दि.०८.०३.२०२२ रोजी मोर्चा काढून जिल्हाधिकारी, ठाणे यांना समक्ष निवेदन दिले होते.
(२) ठाणे जिल्ह्यातील कोकणीपाडा या नागरी वस्तीमधील १८७ वैयक्तिक वनहक्क दावे जिल्हास्तरिय समितीकडे प्राप्त असून त्यापैकी १६७ दावे मान्य व २० दावे अमान्य करण्यात आलेले आहेत. तथापी,जिल्हाधिकारी,ठाणे यांनी नागरी क्षेत्रातील वनहक्क दावे प्रदान केल्यानंतर भविष्यात त्याचा गैरवापर होऊ नये यासाठी अतिरिक्त निर्बंध लावणे आवश्यक ठरेल यासंदर्भात शासनाकडे मार्गदर्शन मागितले होते.

त्यानुषंगाने शहरी भागाचा,विशेषत: मुंबई महानगर प्राधिकरण (MMR) क्षेत्रातील महानगरपालिका व नगरपालिका तसेच नगरपरिषदांमधील प्राप्त वनहक्कदाव्यासंदर्भात वनहक्क प्रदान केल्यानंतर त्यांचा भविष्यात गैरवापर होऊ नये अथवा त्रयस्थ व्यक्तीने गैरफायदा घेऊ नये यासाठी काही अतिरिक्त उपाययोजना करणे आवश्यक असल्याने याबाबत वन विभागाकडून अभिप्राय घेऊन दि.१७/१०/२०२२ च्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या जनजाती कार्य मंत्रालयाचे मार्गदर्शन दि.१२/०८/२०२२ रोजीच्या राज्यस्तरीय सनियंत्रण समितीच्या बैठकित घेतलेल्या निर्णयानुसार मागविण्यात आलेले आहेत. तसेच निवेदनातील इतर मागण्यांसंदर्भात नियमानुसार उचित कार्यवाही करण्याबाबत संबधित विभागांना जिल्हाधिकारी कार्यालय,ठाणे मार्फत सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हा पोलिस मुख्यालयात कार्यरत असलेल्या पोलिस हेड कॉन्स्टेबलने घरात आत्महत्या केल्याबाबत

**(३९) ४८४०६ (०१-११-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा पोलिस मुख्यालयात कार्यरत असलेल्या पोलिस हेड कॉन्स्टेबलने पुसद येथील लक्ष्मीनगरातील राहत्या घरात गळफास लावून दिनांक १७ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यात आला असून मयताने आत्महत्येपूर्वी नोट लिहून त्यामध्ये आत्महत्येस जिल्हा पोलिस अधिक्षक, यवतमाळ हे जबाबदार असल्याचे नमूद केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२३) :** (१) होय.

(२) होय.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, पुसद येथे अकस्मात मृत्यु क्र.२१/२०२२, भादंवि कलम १७४ अन्वये प्रकरण नोंद करण्यात आले आहे.

मयताने आत्महत्येपूर्वी सुसाईड नोट लिहून त्यामध्ये आत्महत्येस जिल्हा पोलिस अधीक्षक, यवतमाळ हे जबाबदार असल्याचे नमूद केले आहे. तथापि, चौकशी दरम्यान मृतकाने आजारपणाला कंटाळून गळफास घेतला आहे, असे मृतकाचे नातेवाईक सांगत आहेत. तसेच, पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचेविरूध्द कोणतीही तक्रार नाही.

(३) सदर प्रकरणात प्राप्त एम.एल.सी. नुसार वेळीच अकस्मात मृत्यु नोंदवून त्याची चौकशी/तपास उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद यांचेकडून सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोरगाव (लोहा, जि.नांदेड) निराधारांचे मागील दीड वर्षापासून मानधन बंद असल्याबाबत

**(४०) ४८७०९ (२०-०९-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगाव (ता. लोहा जि.नांदेड ) येथील संजय गांधी निराधार व श्रावणबाळ या योजनेतील ६० ते ७० लाभार्थ्यांचे अज्ञात व्यक्तीने केलेल्या तक्रारीची कोणतीही चौकशी न करता गेल्या दीड वर्षापासून मानधन बंद केल्यामुळे या लाभार्थ्यांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे दि.२८ एप्रिल,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी लाभार्थ्यांनी दि.२६ एप्रिल,२०२२ रोजी वा त्यासमारास कार्यालयावर मोर्चा काढून आपला निषेध नोंदवला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार बंद असलेले मानधन लाभार्थ्यांना तातडीने अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०३-२०२३) :** (१), (२) व (३) बोरगांव, (ता.लोहा, जि. नांदेड) येथील विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थी अपात्र असल्याबाबतची तक्रार दिनांक ११/०२/२०२१ रोजी प्राप्त झाल्याने पात्र ११० लाभार्थ्यांची चौकशी करण्यात आली. चौकशीत ३७ लाभार्थी अपात्र करण्यात आले आहे. तर ३९ लाभार्थ्यांना माहे मार्च, २०२१ पासून नियमित अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे. उर्वरित ३४ लाभार्थ्यांची फेरसखोल चौकशी करणे आवश्यक

असल्याने त्यांचे अर्थसहाय्य थांबविण्यात आले. ३४ लाभार्थ्यांची फेरचौकशी एप्रिल, २०२२ मध्ये पूर्ण झाली असून सदर लाभार्थी चौकशीमध्ये पात्र ठरल्याने त्यांना मार्च, २०२१ ते मार्च, २०२२ या कालावधीतील अर्थसहाय्याचे वितरण माहे जून, २०२२ मध्ये करण्यात आले आहे.

तसेच सदरहू लाभार्थ्यांना माहे जुलै, २०२२ पासून अर्थसहाय्य नियमितपणे वितरीत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे आंबिवली, अंधेरी (पश्चिम) मुंबई येतील झोपडपट्टी पुर्नवसन योजनेबाबत**

**(४१) ५०४९३ (२९-०१-२०२३). श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पश्चिम) कुरवंड सिटी एस.क्र. ८२५/२ व शासनाच्या ८२५/१ पैकी मौजे आंबिवली या जागेवर माहे ऑगस्ट २००० मध्ये वा त्या दरम्यान झोपडपट्टी पुर्नवसन योजना प्रस्तावित करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणाच्या अभियांत्रिकी विभागाचे अधिकाऱ्यांनी प्रादेशिक परिवहन विभागाच्या या भुखंडामधून वाहणाऱ्या मोगरा नाल्याचे चटई क्षेत्रफळ नियमबाह्यरित्या विकासक मे.शिव इन्फ्राव्हीजन यांना मंजूर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नियमबाह्यरित्या चटई क्षेत्रफळ मंजुर करणाऱ्या संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ च्या नियम ३३ (१०) अंतर्गत योजनेचे विकासक मे.शिव इंन्फ्रा व्हिजन प्रा.लि. यांना सुधारित आशयपत्र दि.०५.१२.२०१९ रोजी निर्गमित करण्यात आले. सदर आशयपत्रानुसार प्रादेशिक परिवहन विभागाचे व महाराष्ट्र शासनाच्या मालकीचे योजनेत सामिल क्षेत्र २११९७.३० चौ.मी. इतके आहे.

सदर संपूर्ण क्षेत्र (नाल्यासहीत) मंजूर विकास नियोजन आराखडा-२०३४ अन्वये प्रादेशिक परिवहन कार्यालय (ET१.३) या अस्तित्वात असलेल्या आरक्षणाने बाधित होत आहे.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ च्या नियम १७(३)(D)(७)मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे:-

'Reservation area beyond the slum boundary on open land/non-slum area/Nala shall have to be developed entirely for the intended purpose only'

सदर तरतुदीन्वये प्रादेशिक परिवहन कार्यालय (ET१.३) चे आरक्षण विकसित होणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ च्या नियम १७(३)(D)(४) अन्वये २०% बांधीव क्षेत्रफळ काढण्यात आले आहे.

तसेच विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ च्या नियम ३३(१०) प्रमाणे विकासकास द्यावयाचा विक्री घटक हा योजनेचे क्षेत्रफळ, विकसित जागेचे मुल्य व बांधकामाच्या आर्थिक दरपत्रकान्वयेची किंमत यावर अवलंबून आहे. सदर योजनेचे क्षेत्रफळ हे वर नमूद तरतुदीमधील तक्त्याच्या ०१ हेक्टर ते ०५ हेक्टर या तक्त्यामध्ये मोडत आहे. योजनेच्या जमिनीची किंमत/बांधकामाचा दर (LR/RC) प्रमाण ३.३६ इतके असल्याने विक्री घटकाकरिताचे पुनर्वसन घटकाच्या प्रमाणाचे गुणोत्तर १:१.१० असे आहे.

यास्तव, विकासकास नियमबाह्य चटई क्षेत्रफळ देण्यात आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुलचेरा (जि. गडचिरोली) तालुक्यातील सुंदरनगर येथे बनावट श्रमकार्ड वितरीत केल्याबाबत**

**(४२) ५२१०९ (१८-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलचेरा,( जि. गडचिरोली ) तालुक्यातील सुंदरनगर येथील नागरिकांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम इमारत कल्याणकारी मंडळाचे बोगस कार्ड देवून त्यांच्याकडून पैसे वसूल करण्याच्या विरोधात मुलचेरा येथील पोलिस स्टेशनमध्ये दि. २९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२३) :** (१) व (२) होय.

प्रस्तुत प्रकरणात आरोपीने शासनाच्या योजनेचा लाभ देण्याचे आमिष देऊन सामान्य नागरिकांना अनधिकृतपणे कामगार असल्याचे दाखवित त्यांचे बनावट ई-श्रमकार्ड तयार करून शासनाची व कामगारांची फसवणूक केल्याबद्दल पोलीस ठाणे, मुलचेरा (जि. गडचिरोली) येथे गु.र.क्र. ६२/२०२२ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१ अन्वये दिनांक २९.०९.२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाघेबाभूळगाव, (ता.केज,जि.बीड) येथील मध्यम प्रकल्पाच्या विशेष दुरुस्ती कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४३) ५२११० (२७-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघेबाभूळगाव (ता.केज, जि.बीड) येथील मध्यम प्रकल्पाच्या पुच्छ कालव्याच्या विशेष दुरुस्तीच्या ०२,२१,८०,९१६/- एवढ्या रकमेच्या प्रस्तावास शासनाने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. परंतु त्यासाठी अद्याप निधी उपलब्ध करून दिलेला नाही. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००६ व २००८ मध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे पुराचे पाणी सांडव्यामधून पुच्छ कालव्याद्वारे जात असतांना नजीकच्या शेतात जाऊन शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले होते. हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाच्या विशेष दुरुस्ती कामासाठी त्वरित निधी उपलब्ध करून देऊन काम सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री यांच्याकडे दि. ०३ नोव्हेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी निधी मंजूर करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.

ता.केज,जि.बीड येथील वाघेबाभूळगाव मध्यम प्रकल्पाच्या पुच्छ कालव्याच्या विशेष दुरुस्तीच्या कामास शासन निर्णय क्रमांक प्रमाप्र-२०२१/प्र.क्र.२३१/२०२१/सिं.व्य.(कामे),दि.२२ जुलै,२०२२ अन्वये रु.२,२१,८०,९१६/- प्रशासकीय मान्यता प्रदान करुन सदर कामासाठी डिसेंबर-२०२२ च्या हिवाळी अधिवेशनात रु.०.०१ लक्ष एवढी लाक्षणिक तरतूद करण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर कामासाठी लाक्षणिक तरतूद डिसेंबर-२०२२ च्या हिवाळी अधिवेशनात करण्यात आलेली आहे. सदर

कामाची निविदा प्रक्रिया राबविणेची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे. सन २०२३-२४ मध्ये सदर दुरुस्तीच्या कामास निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील प्रवासी जल वाहतूक प्रकल्पांना गती देण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबाबत

**(४४) ५३०६१ (२३-०१-२०२३). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील प्रवासी जल वाहतूक प्रकल्पांना गती देण्याचा निर्णय शासनाने माहे नाव्हेंबर, २०२२ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने मुंबई परिसरात कोण-कोणत्या ठिकाणी नवीन प्रवासी जल वाहतूक प्रकल्प सुरु करण्यात येणार आहेत व त्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे,
(३)असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,
(४)नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दादाजी भुसे (२६-०४-२०२३) :**(१) होय.
(२) व (३) मुंबई परिसरात नवीन प्रवासी जल वाहतुक प्रकल्पासंबंधी तपशील सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.
(i) राष्ट्रीय जलमार्ग क्र.५३ अंतर्गत वसई ते कल्याण येथील खाड्यामधुन जलवाहतुक सुरु करण्याकरिता प्रथम टप्प्यात १. डोंबिवली, ठाणे (रु.२१.३० कोटी) २. कोलशेत, जि.ठाणे (रु.३०.३६ कोटी) ३. मीरा भाईंदर,जि.ठाणे (रु.२४.४६ कोटी) ४. काल्हेर, जि.ठाणे (रु.२३.५५ कोटी) असा एकूण ९९.६७ कोटी रकमेच्या प्रकल्पास केंद्र शासनाच्या सागरमाला योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून या ठिकाणी जेट्टी व तत्सम सुविधा निर्माण करणेसंदर्भातील कामांची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(ii) राष्ट्रीय जलमार्ग क्र. ५३ अंतर्गत जलवाहतुक सुरु करण्याच्या दुस-या टप्प्यामध्ये १. मीठबंदरे, ठाणे, (रु.१०.७८ कोटी) २. मुलुंड, मुंबई उपनगर (रु.४७.१३ कोटी) ३. ऐरोली, नवी मुंबई (रु.३२.८५ कोटी) ४. वाशी, नवी मुंबई (रु.३३.७८ कोटी) येथे जेट्टी व तत्सम सुविधा निमार्ण करणे यासाठी एकूण रु. १२४.५४ कोटी एवढ्या रक्कमेची कामे प्रस्तावित असून त्यावर कार्यवाही सुरु आहे.
(iii) मुंबई परिसरात रेडिओ क्लब, मुंबई येथे प्रवासी/ पर्यटन जेट्टी, टर्मिनल इमारत व तत्सम सुविधा निर्माण करणे या रु.१६२.९८ कोटी रकमेच्या कामास केंद्र शासनाचे पत्र दिनांक १६.११.२०१२ अन्वये सागरमाला योजने अंतर्गत मंजूरी प्रदान करण्यात आली असून या कामांची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(iv) मुंबई DCT ते मोरा ता. अलिबाग, जि. रायगड या ठिकाणी जलवाहतुक प्रकल्प सुरु करण्याचे नियोजन असून तेथे रो-रो जेट्टी व तत्सम सुविधा निर्माण करणे या कामाचे कार्यारंभ आदेश दि.१३.०७.२०२२ अन्वये देण्यात आलेले आहेत सद्यस्थितीत सदर काम प्रगतीपथावर आहे.
(v) मुंबई DCT ते काशिद व दिघी या ठिकाणी रो-रो पॅक्स प्रवासी जलवाहतूक प्रकल्प सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. काशिद रो-रो जेट्टीचे काम प्रगतीपथावर असून दि.३१.०५.२०२३ पर्यंत पूर्ण होणार आहे. काशिद येथील फ्लोटींग पान्टून बसविणे ही कामे करण्याचेही प्रस्तावित असून त्यावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विलेपार्ले(मुंबई)लोहिया नगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील कामे प्रलंबित असल्याबाबत

**(४५) ५३८१८ (२९-०१-२०२३). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विलेपार्ले (मुंबई) लोहिया नगर, येथील समर्थ को. ऑप. हौ. सोसायटी, एकता एस. आर. ए., लोहिया – रघुवंशी एस.

आर. ए. व प्रगती मंडळ या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील कामे, सुमारे २० वर्षांपासून प्रलंबित असल्यामुळे तेथील रहिवाश्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकता एस. आर. ए. व लोहिया – रघुवंशी एस. आर. ए. प्रकल्पातील सोसायट्यांच्या हस्तांतरणासोबत, मूळ सदनिकाधारकांशी करार व जागेचे प्लॉटिंगही झाले नसल्याचे तसेच प्राधिकरणाकडे जमा असलेल्या देखभाल ठेव रकमेचा परतावाही सन २००१ पासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे तक्रार करुनही कोणती कार्यवाही करण्यात न आली नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विलेपार्ले येथील प्रलंबित झोपडपट्टी पुनर्वसन योजना लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकल्पाचे मूळ विकासक मुंबई महानगरपालिका आहे. प्रकल्पाकरिता १) मे.एचडीआयएल व २) मे.पायोनिअर इंडिया डेव्हलपर्स प्रा.लि. यांना दुय्यम विकासक म्हणून नेमण्यात आले आहेत. सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या लोहिया नगर वसाहतीच्या अभिन्यासामध्ये एकूण ८ इमारतीं मध्ये ८४३ सदनिकांचे बांधकाम प्रस्तावित होते. यापैकी ७ इमारतींमधील ७१४ सदनिकांचे बांधकाम पूर्ण झाले असून त्यांना दि.०२/०९/२००३ रोजी भोगवटा प्रमाणपत्रही देण्यात

आले आहे. तसेच उर्वरित इमारत क्र.अे-४ मध्ये ११५ एवढया सदनिका, ०९ बालवाडी, ०९ समाज केंद्र व ०९ संस्था कार्यालये बांधण्यात आली असून त्यांना दि.३१/०३/२०२२ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे. सदर योजनेतील एकूण ८४३ रहिवाशी सदनिकांपैकी मुंबई महानगरपालिकेने आतापर्यंत ८०३ सदनिकांचे वितरण केलेले आहे. तर उर्वरित ४० सदनिका महानगरपालिकेस हस्तांतरण करण्यासाठी दुय्यम विकासकाकडे पाठपुरावा सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

१)एकता एसआरए सह.गृह.संस्था मर्या. इमारत क्र.बी/३, विलेपार्ले (पूर्व) मुंबई या संस्थेस मूळ देखभाल ठेव रु.१६,००,०००/-, दि.२६.०७.२०१७ रोजी आणि त्यावरील व्याज रु.१७,८७,२४२/- व रु.१,४७,४५०/- अनुक्रमे दि.२६.०७.२०१७ व दि.२१.०६.२०२२ रोजी संस्थेच्या बँक खात्यात जमा केलेले आहेत. आजमितीस एकता एसआरए सह.गृह. संस्थेस प्रदान करावयाची देखभाल ठेव रक्कम व त्यावरील व्याज प्रलंबित नाही.

२) लोहिया रघुवंशी एसआरए सह.गृह.संस्थेकडून देखभाल ठेव व त्यावरील व्याज मागणी बाबतचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास प्राप्त झालेला नाही.

३) याशिवाय सदर प्रकल्पातील आशिर्वाद (ए-३) एसआरए सह.गृह.संस्थेची मूळ देखभाल ठेव रु.२८,८०,०००/-, दि.१९.०१.२०२२ तसेच त्यावरील व्याज रु.३९,२८,३७७/- व रु.१०,४७४/- अनुक्रमे दि.१९.०१.२०२२ व दि.११.०२.२०२२ रोजी संस्थेच्या खात्यात जमा करण्यात आली आहे.

४) युनिटी(ए-२)एसआरए सह.गृह.संस्था मर्या. या संस्थेची मूळ देखभाल ठेव रु. रु.२८,८०,०००/-, दि.१०.०३.२०२२ तसेच त्यावरील व्याज रु.३७,०३,९३१/- व रु.०७,९०९/- अनुक्रमे दि.१०.०३.२०२२ व दि.२८.०४.२०२२ रोजी संस्थेच्या खात्यात जमा करण्यात आली आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

प्रस्तुत प्रकरणी ॲड.पराग अळवणी, विधानसभा सदस्य यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील प्रलंबित प्रश्नांसंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या दालनात दि.२४.०९.२०२१ रोजी बैठक घेतली. सदर उपस्थित केलेल्या मुद्दयांवर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीबाबत दि.२२.०४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये

ॲड.पराग अळवणी, विधानसभा सदस्य यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### देगलूर बिलोली तालुक्यात सातत्याने खंडित होणारा वीज पुरवठा नियमित करण्याबाबत

**(४६) ५४५५४ (२०-०१-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर विधानसभा मतदारसंघातील देगलूर व बिलोली या दोन्ही तालुक्यात वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढलेले असल्याने नागरिकांना प्रचंड गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सतत खंडित होणारा वीजपुरवठा आणि कमी जास्त दाबाच्या वीजपुरवठ्यामुळे रोहित्र व विजेची उपकरणे जळण्याचे प्रमाण वाढून ग्राहकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील त्रस्त शेतकरी तसेच शहरी भागातील वीज ग्राहक वारंवार तक्रार देऊनही दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित कर्मचारी अधिकारी यांचे विरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही.

देगलूर उपविभागात दि.११.०६.२०२२ ते दि.१३.०६.२०२२ या कालावधीत वादळी पाऊस व वाऱ्यामुळे देगलूर शहरी भागाचा वीज पुरवठा तांत्रिक बिघाडामुळे एकूण २८ तास ३० मिनिटे बंद होता. तसेच बिलोली उपविभागात दि. २३.१०.२०२२ ते दि. २४.१०.२०२२ या कालावधीत वादळी पाऊस व वाऱ्यामुळे १३२ केव्ही शंकरनगर उपकेंद्रातून निघणाऱ्या ३३ केव्ही बामणी वाहिनीचे २ पोल पडल्यामुळे व वीज वाहिनी तुटल्यामुळे ९ गावांचा वीज पुरवठा १२ तास बंद होता.

(२) हे खरे नाही.

तांत्रिक बिघाडामुळे अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे रोहित्र/विजेची उपकरणे जळाल्यास कमीत कमी वेळेत सदर रोहित्र बदली करण्यात येतात.

(३) ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाल्यास महावितरण कंपनीच्या कार्यालयात तसेच ऑनलाईन पध्दतीने तक्रार देता येते. सदर तक्रार प्राप्त झाल्यानंतर अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत वीज यंत्रणेतील बिघाड दूर करुन कमीत कमी वेळेत वीजपुरवठा पूर्ववत करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लक्कडकोट व बेडकी (ता.नवापूर, जि.नंदुरबार) या गावांना अखंडीत वीज पुरवठा करण्याबाबत

**(४७) ५४७८४ (२०-०१-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लक्कडकोट व बेडकी (ता.नवापूर, जि.नंदुरबार) या गावांना गांवठाण फीडरसाठी निधी मंजूर असतांना देखील या दोन्ही गावात बऱ्याच दिवसांपासून १८ तास भारनियमन होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गांवठाण फीडरसाठी निधी मंजूर असतांनादेखील ते कार्यान्वित न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या दोन्ही गांवातील गावकऱ्यांच्या रास्त मागणीवर विचार करुन, या गावात फीडर कार्यान्वित करुन विजपुरवठा अखंडीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०४-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

लक्कडकोट व बेडकी (ता. नवापूर, जि. नंदुरबार) या गावांना ३३/११ केव्ही बंधारफळी उपकेंद्रातून निघणाऱ्या ११ के.व्ही. लक्कडकोट या विलगीकृत कृषी वाहिनीव्दारे मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार ८ तास दिवसा किंवा ८ तास रात्री चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा केला जातो व उर्वरित कालावधीत (१६ तास) वीज पुरवठा बंद ठेवला जातो.

(२) लक्कडकोट व बेडकी (ता. नवापूर, जि. नंदुरबार) या गावांना गावठाण वाहिनीव्दारे वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबतचे काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर करुन कंत्राटदारांना कार्यादेश देण्यात आले होते. सदर प्रस्तावित गावठाण वाहिनीवर लक्कडकोट व बेडकी या दोन ठिकाणी रेल्वे क्रॉसिंग करण्यासाठी भुमिगत पॉवर केबल टाकण्याकरिता रेल्वे विभागाची मंजुरी अनुक्रमे डिसेंबर २०२२ व नोव्हेंबर २०२२ मध्ये प्राप्त झाली आहे.
(३) प्राप्त मंजुरीच्या अनुषंगाने सदर वाहिनीचे लक्कडकोट व बेडकी येथील काम प्रगतीपथावर आहे. प्रस्तावित गावठाण वाहिनीचे काम पूर्ण झाल्यानंतर संबंधीत विद्युत निरीक्षक यांची परवानगी घेऊन सदर गावठाण वाहिनी कार्यान्वित करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव जिल्हयातील पाचोरा-भडगांव तालुक्यातील गिरणा प्रकल्पाच्या कालव्याच्या नुतनीकरणाच्या कामांना खास बाब म्हणून मंजूरी देऊन निधी मिळणेबाबत

**(४८) ५५०७६ (२२-०१-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयातील पाचोरा-भडगांव तालुक्यातील गिरणा प्रकल्पाच्या कालव्याच्या नुतनीकरणासाठीच्या कामांना खास बाब म्हणून मंजूरी देऊन निधी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.१० ऑक्टोंबर, २०२२ रोजी वा सुमारास मा.उपमुख्यमंत्री, यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या लेखी निवेदनानुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय, असल्यास त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०२३) :** (१) होय.
(२) पाचोरा भडगांव तालुक्यातील गिरणा प्रकल्पाच्या कालव्यांच्या नुतनीकरणाच्या कामांना खास बाब म्हणून मंजूरी देऊन निधी मिळणेबाबत अंतर्गत जामदा उजवा व डाव्या कालव्याच्या नुतनीकरणाच्या कामाचा रु.२.९७ कोटी रकमेचा प्रस्ताव महामंडळाकडून प्राप्त झाला असता, सन २०२२-२३ मधील मंजूर निधी व दायित्व यांचा विचार करता या आर्थिक वर्षात तापी पाटबंधारे विकास महामंडळाकडील विशेष दुरुस्ती/विस्तार व सुधारणा कामांना प्रशासकीय मान्यता देणे शक्य नसल्याचे शासनाच्या दि.२२.०९.२०२२ च्या पत्रान्वये कार्यकारी संचालक,तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव यांना कळविण्यात आले आहे.
सन २०२३-२४ च्या वार्षिक आखणी अंतर्गत तापी पाटबंधारे विकास महामंडळाने विशेष दुरुस्तीच्या कामांकरिता एकूण रु.१०३ कोटीची मागणी केली असून सदर निधीची तरतूद झालेनंतर सन २०२३-२४ मध्ये सदर अंदाजपत्रकांस प्रशासकीय मान्यता देणे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज विधानसभा मतदारसंघातील (जि. बीड.) विविध समस्या सोडविण्याबाबत

**(४९) ५५०९६ (२७-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि. बीड) येथील १) मांजरा प्रकल्प व मांजरा नदी, ता. केज, जि. बीड. वरील बॅरेजस करिता SCADA प्रणाली विकसित करणे बाबत. २) अंजनपुर, ता. अंबाजोगाई. जि. बीड. व कानडीबोरगाव, जि. लातूर. या ठिकाणी मांजरा नदीवरील विविध समस्यांबाबत. ३) केज, जि. बीड. विधानसभा मतदार संघातील तलावांच्या विशेष दुरुस्ती बाबत समस्या सोडवण्याबाबत मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदामंत्री) यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली होती. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यासन अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई. यांनी त्यांचे पत्र. क्र. व्हीआयपी-२०२२प्र.क्र.३०८/२२/सिंव्य(कामे), दि. १०/१०/२०२२. अन्वये कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) निवेदनाच्या अनुषंगाने सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.
अ) मांजरा प्रकल्प व मांजरा नदी,ता.केज,जि.बीड वरील बॅरेजेस करीता SCADA प्रणाली विकसित करणेबाबत सद्यस्थितीत यांत्रिकी /जलविद्युत विभाग यांच्याकडून अंदाजपत्रके प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
ब) अंजनपूर,ता.अंबाजोगाई,जि.बीड व कानडी बोरगाव,जि.लातूर या ठिकाणी मांजरा नदीवरील विविध समस्याबाबत सद्यस्थितीत बोरगाव अंजनपूर बंधा-याच्या गेट दुरुस्तीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता (यांत्रिकी) ,नाशिक यांचे अभिप्राय प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.सदर अभिप्राय प्राप्त होताच, त्यानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
क) केज,जि.बीड विधानसभा मतदारसंघातील तलावाच्या विशेष दुरुस्तीबाबत समस्या सोडवण्याबाबत सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.
१) लिंबाची वाडी सा.त.क्र.२,देठेवाडी सा.त., कासारी लपा :- या प्रकल्पांच्या दुरुस्तीसाठी विशेष दुरुस्तीअंतर्गत अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
२) वाघेबाभुळगाव म.प्र. :- या प्रकल्पाच्या विशेष दुरुस्तीच्या रु.२२१.८१ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त असून, हिवाळी अधिवेशन-२०२२ मध्ये पुरवणी मागणी प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे.
३) कारंजा,उंदरी जवळबन,लिंबाचीवाडी सा.त.क्र १ व डीघोळ :- सदर कामांचा मंडळ स्तरावरील देखभाल दुरुस्ती कामांमध्ये समावेश करण्यात आला असून, कामे पावसाळयापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील मजरे कारवे येथे महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचे नवीन उपविभाग उभारण्याबाबत**

**(५०) ५५४५१ (२०-०१-२०२३). श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुका हा दुर्गम व डोंगराळ भाग असून महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचे उपविभागीय कार्यालय तालुक्याच्या मुख्य ठिकाणी चंदगड येथे असून या कार्यालयात वीज ग्राहकांना सुमारे ७० ते ८० किलोमीटर जावे लागते आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी तालुक्यातील नागरीकांना येण्या-जाण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागत असून वेळसूध्दा मोठ्या प्रमाणात लागत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचे दुसऱ्या नविन उपविभागाची मजरे कारवे येथे स्थापना करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे दि. २४ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे हे खरेआहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

वि.स. १५७ (32)

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.

सदर उपविभागाचे कार्यक्षेत्र अंदाजे १५० कि.मी. भागात पसरले असून म्हाळुंगे कोळीक इ. गावे चंदगड पासून ७० कि.मी. अंतरावर आहे. तसेच चन्नहट्टी/राजमोळी इ. गावे सुमारे ५०-६० कि.मी. अंतरावर आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) महावितरणव्दारा उपविभाग निर्मितीबाबतची मानके ही कोल्हापूर परिमंडळांतर्गत उपविभाग चंदगड या उपविभागाचे विभाजन करुन नवीन कार्वे उपविभागाची निर्मितीचे निकष पूर्ण करीत नसल्याने सदरच्या प्रस्तावावर सद्यस्थितीत कार्यवाही करण्यात आलेली नाही. तरीही भविष्यात ग्राहक मानंकांचा निकष पूर्ण झाल्यावर महावितरणची आर्थिक परिस्थिती व आर्थिक दायित्वाचा विचार करुन उचित कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव १(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.